१) जळगाव, २) अमरावती,
३)औरंगाबाद,४)उस्मानाबाद,
५)परभणी या शासकीय जिल्हा
<u>ग्रंथालयांसाठी पदनिर्मिती</u>

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन निर्णय क्रमांक मराग्रं २००९/(२८५/०९)/साशि-५,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : ७ डिसें. २०१०

वाचा :-१)शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्रमांक मराग्रं १००३/(१६५/०३)/साशि-५, दिनांक ६ फेब्रुवारी २००४.
२)शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्रमांक मराग्रं १००४/(५४/०४)/साशि-५, दिनांक ४ डिसेंबर २००४.
३) शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, क्र. मराग्र २००८/(६४१/०८) साशि-५, दि. २७ एप्रिल २००९

**<u>प्रस्तावना : -</u>** संदर्भाधिन दिनांक ६ फेब्रुवारी २००४ व दि.४ डिसें. २००४ च्या शासन निर्णयान्वये १५ शासकीय जिल्हा ग्रंथालये स्थापन करण्याबाबत प्रशासकीय मंजूरी देण्यात आली आहे. त्यापैकी १० जिल्हा ग्रंथालयांकरिता प्रत्येकी ४ प्रमाणे ४० पदांच्या निर्मितीस संदर्भ क्र. ३ अन्वये शासन मंजूरी देण्यात आली आहे. उर्वरित ५ जिल्हा ग्रंथालयांकरिता आवश्यक ती पदनिर्मिती करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**<u>शासन निर्णय</u>** :- प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे (१) जळगाव, (२) अमरावती, (३) औरंगाबाद, (४) उस्मानाबाद, (५) परभणी या ५ शासकीय जिल्हा ग्रंथालयांकरीता खाली नमुद केल्याप्रमाणे प्रत्येकी ४ अशी एकूण २० पदे निर्माण करण्यास शासनाची मंजुरी देण्यात येत आहे :-

| अ.क्र. | पदनाम | वेतनश्रेणी | पद संख्या (एका ग्रंथालयाकरिता) | पदसंख्या (पाच ग्रंथालयांकरिता) |
|---|---|---|---|---|
| १. | ग्रंथपाल<br>राजपत्रित -- गट-ब | रू. ९३००-३४८००<br>ग्रेड पे ४४०० | १ | ५ |
| २. | तांत्रिक सहाय्यक<br>अराजपत्रित -- गट-ब | रू. ९३००-३४८००<br>ग्रेड पे ४३०० | १ | ५ |
| ३. | कनिष्ठ लिपिक, गट -क | रू. ५२००-२०२००<br>ग्रेड पे १९०० | १ | ५ |
| ४. | शिपाई -- गट-ड | रू. ४४००-७४४०<br>ग्रेड पे १३०० | १ | ५ |
| | | एकूण | ४ | २० |

२. सदरहू पाच जिल्हा ग्रंथालयांच्या ग्रंथपालांना (गट-ब) या आदेशाद्वारे "कार्यालय प्रमुख" म्हणून घोषित करण्यात येत आहे व त्यांना आहरण व संवितरणाचे अधिकार प्रदान करण्यात येत आहेत.

३. उपरोक्त बाबीवर होणारा खर्च मागणी "क्रमांक डब्ल्यु-४- २२०५, कला व संस्कृती- १०५, सार्वजनिक ग्रंथालये- पंचवार्षिक योजनांतर्गत योजना - (०२)(०२) शासकीय मध्यवर्ती, विभागीय व जिल्हा ग्रंथालयें (२२०५ ०२८ ९)" या लेखाशीर्षाखालील मंजूर तरतुदीतून भागविण्यात यावा.

४. सदर पद निर्मितीस उच्चस्तर सचिव समितीने त्यांच्या दि. १४ सप्टें. २०१० रोजी झालेल्या बैठकीमध्ये मंजूरी दिली आहे.

५. हा शासन निर्णय शासनाचे WWW.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असुन त्याचा संगणकीय सांकेतांक क्र. 201012071829290001 असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

( बा. ओं. हेमाडे )
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,
संचालक, ग्रंथालय संचालनालय,महाराष्ट्र राज्य, मुंबई,
महालेखापाल, (लेखा अनुज्ञेयता) / (लेखा परिक्षा) महाराष्ट्र -१/२ मुंबई/नागपूर,
अधिदान व लेखाधिकारी, मुंबई,
अधिदान व लेखाधिकारी, वांद्रे, मुंबई
जिल्हा कोषागार अधिकारी, जळगाव, औरंगाबाद, अमरावती, उस्मानाबाद, परभणी
नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई /वित्त विभाग (अर्थसं) (व्यय-५)(वित्तीय सुधारणा ) मंत्रालय, मुंबई
उच्च व तंत्र शिक्षण विभाग (साशि-१), / निवड नस्ती साशि-५

सिंधुदूर्ग, नंदूरबार, गोंदिया, लातूर,
गडचिरोली, सोलापूर, सांगली,
अहमदनगर, वाशिम, व हिंगोली.
या जिल्हयातील शासकीय जिल्हा
ग्रंथालयांसाठी पदनिर्मिती

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन निर्णय क्रमांक मराग्रं २००८/(६४१/०८)/साशि-५,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक ३० एप्रिल २००९

वाचा :-१)शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्रमांक मराग्रं १००३/(२६५/०३)/साशि-५, दिनांक ६ फेब्रुवारी २००४.
२)शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्रमांक मराग्रं १००४/(५४/०४)/साशि-५, दिनांक ४ डिसेंबर २००४.

प्रस्तावना :- संदर्भाधिन दिनांक ६ फेब्रुवारी २००४ व दि.४ डिसें. २००४ च्या शासन निर्णयान्वये १५ शासकीय जिल्हा ग्रंथालये स्थापन करण्याबाबत प्रशासकीय मंजूरी देण्यात आली आहे. सदर जिल्हा ग्रंथालयांकरिता आवश्यक ती पदनिर्मिती करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय :- प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे १५ जिल्हयांपैकी, सिंधुदूर्ग, नंदूरबार, गोंदिया, लातूर, गडचिरोली, सोलापूर, सांगली, अहमदनगर, वाशिम, व हिंगोली. या १० जिल्हयांत, प्रत्येक शासकीय जिल्हा ग्रंथालयाकरिता खालीलप्रमाणे प्रत्येकी ४ अशी एकूण ४० पदे निर्माण करण्यास शासनाची मंजुरी देण्यात येत आहे :-

| अ.क्र. | पदनाम | वेतनश्रेणी | पद संख्या (एका ग्रंथालयाकरिता) | पदसंख्या (दहा ग्रंथालयांकरिता) |
|---|---|---|---|---|
| १. | ग्रंथपाल राजपत्रित गट-ब | रू. ६५००-२००-१०५०० | १ | १० |
| २. | तांत्रिक सहाय्यक अराजपत्रित गट-ब | रू. ५५००-१७५-९००० | १ | १० |
| ३. | कनिष्ठ लिपिक, गट -क | रू. ३०५०-७५-३९५०-८०-४५९० | १ | १० |
| ४. | शिपाई गट-ड | रू. २५५०-५५-२६६०-६०-३२०० | १ | १० |
| | | एकूण | ४ | ४० |

:२:

२.		सदरहू सहा जिल्हा ग्रंथालयांच्या ग्रंथपालांना (गट-ब) या आदेशाद्वारे "कार्यालय प्रमुख" म्हणून घोषित करण्यात येत आहे व त्यांना आहरण व संवितरणाचे अधिकार प्रदान करण्यात येत आहेत.

३.		उपरोक्त बाबीवर होणारा खर्च मागणी "क्रमांक डब्ल्यु-४- २२०५, कला व संस्कृती- १०५, सार्वजनिक ग्रंथालये- पंचवार्षिक योजनांतर्गत योजना - (०२)(०२) शासकीय मध्यवर्ती, विभागीय व जिल्हा ग्रंथालये (२२०५ ०२८ ९)" या लेखाशीर्षाखालील मंजूर तरतुदीतून भागविण्यात यावा.

४.		हे आदेश वित्त विभागाच्या सहमतीने व वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. २४९/ व्यय-५, दिनांक १६/४/०९ अन्वये निर्गमित करण्यात येत आहेत.

५.	हा शासन निर्णय शासनाचे WWW.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असुन त्याचा संगणकीय सांकेतांक क्र. 200904271446240001 असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

( दि. शां. तिवरेकर )
उपसचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

संचालक, ग्रंथालय संचालनालय,महाराष्ट्र राज्य, मुंबई,
महालेखापाल, (लेखा अनुज्ञेयता) / (लेखा परिक्षा) महाराष्ट्र -१/२ मुंबई/नागपूर,
अधिदान व लेखाधिकारी, मुंबई,
अधिदान व लेखाधिकारी, बांद्रे, मुंबई
जिल्हा कोषागार अधिकारी, सिंधुदुर्ग, नंदुरबार, गोंदिया, लातूर, गडचिरोली, सोलापूर, सांगली, अहमदनगर, वाशिम, व हिंगोली.
नियोजन विभाग,
वित्त विभाग (अर्थसं) (व्यय-५)(वित्तीय सुधारणा )
उच्च व तंत्र शिक्षण विभाग (साशि-१),
निवड नस्ती साशि-५

मुंबई शहर, सातारा, बीड व नांदेड
या जिल्हयात शासकीय जिल्हा
ग्रंथालयांची स्थापना-
पदनिर्मिती

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन निर्णय क्रमांक मराग्रं १००३/(११०/०३)/साशि-५,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक ३० मार्च, २००५

वाचा :-१)शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्रमांक मराग्रं १०९९/
५१०२५/(६९२)/साशि-५, दिनांक २१ एप्रिल, २००४.
२)वित्त विभागाचे दिनांक ३०.३.२००५ चे परिपत्रक क्रमांक
पुरक १०.०५/प्र.क्र.८/२००५/अर्थसंकल्प-३.

शासन निर्णय :- राज्यातील ज्या जिल्हयात शासकीय ग्रंथालये नाहीत, अशा १९ जिल्हयात शासकीय जिल्हा ग्रंथालयांची स्थापना व त्याकरिता आवश्यक ती पदनिर्मिती करण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता. सदर १९ जिल्हयांपैकी १)मुंबई शहर, २) सातारा, ३) बीड व ४) नांदेड हया चार जिल्हयात शासकीय जिल्हा ग्रंथालये स्थापन करण्यास दिनांक २१ एप्रिल, २००४ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. त्यास तसेच उच्चस्तर सचिव समितीच्या मान्यतेस अनुसरून प्रत्येक ग्रंथालयाकरिता खालीलप्रमाणे प्रत्येकी ४ अशी एकूण १६ पदे निर्माण करण्यास शासनाची मंजुरी देण्यात येत आहे :-

| अ.क्र. | पदनाम | वेतनश्रेणी | पद संख्या (एका ग्रंथालयाकरिता) | पदसंख्या (चार ग्रंथालयांकरिता) |
|---|---|---|---|---|
| १. | ग्रंथपाल राजपत्रित गट-ब | रू. ६५००-२००-१०५०० | १ | ४ |
| २. | तांत्रिक सहाय्यक अराजपत्रित गट-ब | रू. ५५००-१७५-९००० | १ | ४ |
| ३. | कनिष्ठ लिपिक, गट -क | रू. ३०५०-७५-३९५०-८०-४५९० | १ | ४ |
| ४. | शिपाई गट-ड | रू. २५५०-५५-२६६०-६०-३२०० | १ | ४ |
| | | एकूण | ४ | १६ |

२. वरील १६ नवीन पदांपैकी राजपत्रित गट-ब अधिका-यांची ४ पदे सोडून उर्वरित सर्व १२ पदे अतिरिक्त संवर्ग कक्षामधील उपलब्ध कर्मचा-यांमधून भरण्यात यावीत. राजपत्रित अधिका-यांची पदे विहित कार्यपध्दतीनुसार भरण्यात यावीत.

(५८)

३. प्रस्तावित चार जिल्हा ग्रंथालयांच्या ग्रंथपालांना (गट-ब) या आदेशाद्वारे "कार्यालय प्रमुख" म्हणून घोषित करण्यात येत आहे व त्यांना आहरण व संवितरणाचे अधिकार प्रदान करण्यात येत आहेत.

४. उपरोक्त बाबीवर होणारा खर्च मागणी "क्रमांक डब्ल्यु-४- २२०५ कला व संस्कृती- १०५, सार्वजनिक ग्रंथालये- पंचवार्षिक योजनांतर्गत योजना - (०२)(०२) शासकीय मध्यवर्ती, विभागीय व जिल्हा ग्रंथालयें (२२०५०२८९)" या लेखाशीर्षाखालील मंजूर तरतुदीतून भागविण्यात यावा.

५. हे आदेश नियोजन विभाग/ वित्त विभाग यांच्या सहमतीने व वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. ३७०/२००४ व्यय-५, दिनांक २१/७/०४ अन्वये निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

(बा. वि. निकम)
अवर सचिव, महाराष्ट्र राज्य

प्रति,

ग्रंथालय संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
महालेखापाल, महाराष्ट्र -१/२ मुंबई/नागपूर,
अधिदान व लेखाधिकारी, मुंबई,
अधिदान व लेखाधिकारी, वांद्रे, मुंबई
जिल्हा कोषागार अधिकारी, सातारा, बीड व नांदेड,
नियोजन विभाग,
वित्त विभाग (अर्थसं) (व्यय-५)(वित्तीय सुधारणा)
उच्च व तंत्र शिक्षण विभाग (साशि-१),
निवड नस्ती साशि-५

ठाणे, रायगड, रत्नागिरी, नाशिक, धुळे, पुणे, कोल्हापूर व जालना जिल्हयांत जिल्हा ग्रंथालयांची स्थापना...

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन निर्णय क्रमांकः- मराग्रं १०९६/१७११८/(२८९)/साशि-५
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई- ४०० ०३२.
दिनांकः-७ ऑगस्ट १९९७

वाचाः- शासन परिपत्रक, वित्त विभाग क्रमांक पूरक-१०९७/प्र.क्र. १०३/अर्थसंकल्प-३. दिनांक ३० जुलै, १९९७.

**शासन निर्णयः**-विदर्भ विभागात कार्यरत असलेल्या शासकीय जिल्हा ग्रंथालयांच्या धर्तीवर ठाणे, रायगड, रत्नागिरी, नाशिक, धुळे, पुणे, कोल्हापूर व जालना या आठ जिल्हयांत शासकीय जिल्हा ग्रंथालये स्थापन करण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता. सदर ग्रंथालये सध्या भाडयाच्या जागेत सुरू करण्यास, त्यासाठी खालील पदे निर्माण करण्यास व ती दिनांक २८.२.१९९८ पर्यत चालू ठेवण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे. तसेच या ग्रंथालयांच्या स्थापनेसाठी येणा-या रूपये ४०.०० लाख (रूपये चाळीस लाख फक्त) खर्चास शासनाची मंजूरी देण्यात येत आहे:-

| अ.क्र | पदनाम | वेतनश्रेणी | पद संख्या (एका ग्रंथालया -साठी) | पद संख्या (ग्रंथालयासाठी) |
|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. |
| १ | ग्रंथपाल गट "ब" | रू. २०००-६०-२३००-दरो-७५-३२००-१००-३५०० | १ | ८ |
| २ | तांत्रिक सहाय्यक गट "ब" | रू. १६४०-६०-२६००-दरो-७५-२९०० | १ | ८ |
| ३ | मुख्य लिपिक गट "क" | रू. १४००-४०-१६००-दरो-५०-२३००-६०-२६०० | १ | ८ |
| ४ | वरिष्ठ लिपिक गट "क" | रू. १२००-३०-१५६०-दरो-४०-२०४० | १ | ८ |
| ५ | कनिष्ठ लिपिक गट "क" | रू. ९५०-२०-११५०-दरो-२५-१५०० | १ | ८ |
| ६ | शिपाई, गट "ड" | रू. ७५०-१२-८७०-दरो-१४-९४० | १ | ८ |
| ७ | चौकीदार गट "ड" | रू. ७५०-१२-८७०-दरो-१४-९४० | १ | ८ |
| | | एकुण | ७ | ५६ |

२.	ग्रंथालय संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी विहित कार्यपध्दतीचा अवलंब करून उपरोक्त पदे भरण्याची कार्यवाही करावी. प्रस्तावित आठ शासकीय जिल्हा ग्रंथालयांच्या ग्रंथपालांना (गट ''ब'' ) या आदेशाद्वारे '' कार्यालय प्रमुख '' म्हणून घोषित करण्यात येत आहे व त्यांना आहरण व संवितरणाचे अधिकार प्रदान करण्यात येत आहेत.

३.	उपरोक्त बाबीवर होणारा खर्च मागणी क्र. डब्ल्यू-४ ''२२०५-कला व संस्कृती-१०५-सार्वजनिक ग्रंथालये-पंचवार्षिक योजनांतर्गत योजना-(दोन)(बी) शासकीय मध्यवर्ती, विभागीय व जिल्हा ग्रंथालये '' या अर्थशिर्षाखालील १९९७-९८ या वर्षाच्या मंजूर तरतूदीतून भागविण्यात यावा.

४.	हे आदेश नियोजन विभाग/वित्त विभाग यांच्या सहमतीने व वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. ३४२/व्यय-५, दिनांक ९.६.१९९७ अन्वये निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

( कुं. गु. बगाडे )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१.	ग्रंथालय संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२.	महालेखापाल महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
३.	सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
४.	जिल्हा कोषागार अधिकारी, ठाणे, रायगड, रत्नागिरी, नाशिक, धुळे, पुणे, कोल्हापूर व जालना.
५.	नियोजन विभाग
६.	वित्त विभाग (अर्थसं) व्यय-५
७.	उच्च व तंत्र शिक्षण विभाग (साशि-१)
८.	निवड नस्ती/साशि-५

पोळ १८२९८.

मुंबई उपनगर जिल्हा शासकीय ग्रंथालयाची स्थापना करणेबाबत...

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग
क्रमांक:एलआरबी १०९५/३८३२/[२४/९५]/ माशि-५
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२
दिनांक:- २/११/९८

वाचा:- शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र. अंदाज १०९६/प्र.क्र. १९२/ अर्थसंकल्प-३, दिनांक ३१ जुलै, १९९६.

शासन निर्णय:- महाराष्ट्र राज्याच्या पुनर्रचनेच्या वेळी, पूर्वी मध्य प्रदेशात असलेल्या विदर्भ विभागातील आठ शासकीय जिल्हा ग्रंथालये वर्ग करण्यात आली. सन १९५५ साली मध्यप्रदेश सरकारने विदर्भातील सार्वजनिक ग्रंथालयांना "पुस्तकांचे संच पुरविणे" या प्रमुख उद्दिष्टाखालील "४-क" योजनेअंतर्गत असलेले विविध कार्यक्रम राबविण्यासाठी या ग्रंथालयांची स्थापना केली होती. मुंबई उपनगर जिल्ह्याची वाढती लोकसंख्या व साक्षरतेचे प्रमाण लक्षात घेऊन विदर्भ विभागातील सध्या कार्यरत असलेल्या शासकीय जिल्हा ग्रंथालयांच्या धर्तीवर "मुंबई उपनगर"जिल्ह्यात शासकीय जिल्हा ग्रंथालयाची स्थापना करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

२. मुंबई उपनगर जिल्ह्यामध्ये शासकीय जिल्हा ग्रंथालयाची स्थापना करण्यास व त्यासाठी खालील पदाच्या निर्मितीस प्रथमत: दि. २८.२.९७ रोजी संपणाऱ्या कालावधीपर्यंत मान्यता देण्यात येत आहे. तसेच ग्रंथालय स्थापनेसाठी रु. १.०० लाख[ रुपये एक लाख फक्त] एकदाच खर्चास शासनाची मंजुरी देण्यात येत आहे :-

| अ.क्र. | पदनाम | वेतन | पदसंख्या |
|---|---|---|---|
| १] | ग्रंथपाल वर्ग-२ | रु. २०००-६०-२३००-दरो-७५-३२००-१००-३५०० | १ |
| २] | तांत्रिक सहाय्यक वर्ग-२ | रु. १६४०-६०-२६००-दरो-७५-२९०० | १ |
| ३] | मुख्य लिपिक वर्ग-३ | रु. १४००-४०-१६००-दरो-५०-२३००-६०-२६०० | १ |
| ४] | वरिष्ठ लिपिक वर्ग-३ | रु. १२००-३०-१५६०-दरो-४०-२०४० | १ |
| ५] | कनिष्ठ लिपिक वर्ग-३ | रु. ९५०-२०-११५०-दरो-२५-१५०० | १ |
| ६] | शिपाई वर्ग-४ | रु. ७५०-१२-८७०-दरो-१४-९४० | १ |
| ७] | चौकीदार-वर्ग-४ | रु. ७५०-१२-८७०-दरो-१४-९४० | १ |
| | | एकूण : | ७ पदे |

कृ.मा.प.

ग्रंथालय संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी योग्य त्या कार्यपध्दतीचा अवलंब करून उपरोक्त पदे भरण्याची कार्यवाही करावी.

३. प्रस्तुत खर्च मागणी क्र. डब्ल्यू-४ "२२०५-कला व संस्कृति -१०५- सार्वजनिक ग्रंथालये "या लेखाशिर्षाखालील चालू वर्षाच्या अर्थसंकल्पीय तरतूदीतून भागविण्यात यावा.

४. हा शासन निर्णय, नियोजन विभाग/वित्त विभाग यांच्या सहमतीने व वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. ३५९/व्यय-५, दिनांक १३. ६. ९६ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

[ अ. चिं. तिरोडकर ]
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
१] ग्रंथालय संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२] सहाय्यक ग्रंथालय संचालक, मुंबई विभाग, कोकण भवन, नवी मुंबई
३] महालेखापाल-१, मुंबई
४] निवासी लेखा अधिकारी, मुंबई
५] अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
६] नियोजन विभाग
७] वित्त विभाग[अर्थसं/व्यय-५]
८] उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग[साशि-१]
९] निवड नस्ती साशि-५

मुंबई उपनगर जिल्हा शासकीय ग्रंथालयाची स्थापना करणेबाबत...

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग
शुध्दिपत्र क्रमांक:एलआयबी १०९५/३८३२/[२४/९५]/साशि-५
मंत्रालय विस्तार भवन,मुंबई-४०००३२

दिनांक:- १९ मार्च,१९९७.

वाचा:- शासन, निर्णय,उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग
क्रमांक:एलआयबी १०९५/३८३२/[२४/९५]/साशि-५
दिनांक: २.११.१९९६.

शुध्दिपत्र :- उपरोक्त शासन निर्णयातील परि.३ मधील दुसऱ्या ओळीतील "सार्वजनिक ग्रंथालये" या शब्दापुढे "पंचवार्षिक योजनांतर्गत योजना[दोन्ही] शासकीय मध्यवर्ती विभागीय व जिल्हा ग्रंथालये [२२०५०२८९]" असे वाचावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

[ कुं. गु. बगाडे ]
अवर सचिव,महाराष्ट्र शासन

प्रति,
१] ग्रंथालय संचालक,महाराष्ट्र राज्य,मुंबई.
२] ग्रंथपाल,शासकीय जिल्हा ग्रंथालय,मुंबई उपनगर,मुंबई.
३] महालेखापाल-१,मुंबई.
४] निवासी लेखा अधिकारी,मुंबई.
५] अधिदान व लेखा अधिकारी,मुंबई.
६] नियोजन विभाग
७] वित्त विभाग[अर्थसं/व्यय-५]
८] उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग[साशि-१]
९] निवड नस्ती [साशि-५]

पार्सेकर १९.३